**इराणच्या राष्ट्राध्यक्षांकडून पंतप्रधानांना दूरध्वनी**

22 जून 2025

इराणचे राष्ट्राध्यक्ष महामहिम श्री. मसूद पेझेश्कियान यांनी आज दूरध्वनीवरून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधला.

2. राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांनी पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली आणि प्रदेशातील सद्यस्थितीविषयीचा विशेषतः इराण आणि इस्रायलमधील सुरू असलेल्या संघर्षाविषयीचा त्यांचा दृष्टीकोन स्पष्ट केला.

3. अलीकडच्या काळातील वाढत्या तणावाविषयी भारताला वाटणारी तीव्र चिंता पंतप्रधानांनी व्यक्त केली. भारत शांतता आणि मानवतेच्या बाजूने असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. या संदर्भात, पंतप्रधानांनी पुढील मार्ग म्हणून तणाव कमी करणे, संवाद आणि राजकीय मुत्सद्दी धोरण यांच्या गरजेवर भर दिला. त्यांनी प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थैर्य पुनर्स्थापित होण्यासाठी भारताचा पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार केला.

4. पंतप्रधानांनी भारतीय समुदायाला मायदेशी सुरक्षित परतण्यासाठी दिलेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल इराणचे राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांचे आभार मानले. उभय नेत्यांनी, व्यापार आणि आर्थिक सहकार्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि परस्पर नागरिक संबंध या आणि अशा विविध क्षेत्रांत द्विपक्षीय सहकार्य भक्कम करण्यासाठी काम करत राहाण्यासाठी सामाईक वचनबद्धता व्यक्त केली.

5. परस्पर संपर्कात राहण्यास त्यांनी सहमती दर्शविली.

**नवी दिल्ली**

**22 जून 2025**